अतितात्काळ/अर्थसंकल्प प्राथम्य

महाराष्ट्र विनियोजन(लेखानुदान) अधिनियम, २०१३

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
क्रमांक.बीजीटी -२०.१३/प्र.क्र. ४३/अर्थसंकल्प-३.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २८ मार्च, २०१३.

## परिपत्रक

सन २०१३-२०१४ चा अर्थसंकल्प दिनांक २० मार्च,२०१३ रोजी विधानमंडळास सादर करण्यात आला. सदर अर्थसंकल्पावर मागणीनिहाय चर्चा होऊन संपूर्ण अर्थसंकल्पास मंजूरी मिळेपर्यंतचा एप्रिल व मे, २०१३ या दोन महिन्याचा खर्च भागविण्यासाठी विधानमंडळाने **"महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक,२०१३"** मंजूर केले आहे. सदर विधेयकाचे आता अधिनियमात रुपांतर झाले असून ते **महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ म्हणून महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग-४, दि. २८ मार्च, २०१३ मध्ये** प्रसिध्द करण्यात आले आहे.

२. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी "सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता प्रस्तावित केलेल्या विनियोजनांची अनुसूची " स्तंभ क्रमांक ७ व ८ यामध्ये दर्शविलेल्या रकमांचे तात्काळ वाटप करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( अ. ना. भोसले )
उप सचिव, वित्त विभाग.

प्रति,

सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
मंत्रालयाचे सर्व विभाग,
सर्व मंत्रालयीन विभागांचे सह सचिव / उप सचिव (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई (अधिनियमांच्या २५ प्रतींसह),
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र,नागपूर (अधिनियमांच्या ५ प्रतींसह),
महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र, मुंबई, (अधिनियमांच्या १५ प्रतींसह),
महालेखापाल (लेखापरिक्षा),महाराष्ट्र,नागपूर (अधिनियमांच्या ५ प्रतींसह),
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (अधिनियमांच्या ४० प्रतीसह),
निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई (अधिनियमांच्या ५ प्रतींसह),
कार्यासन प्रशासन-४,वित्त विभाग,
निवड नस्ती, अर्थसंकल्प-३.